# *मार्च महिन्यात*

# समयाला समय देणे

१ मार्च, २०२५

आत्मीय वाचक,

आणखी एका पत्राची वेळ आली आहे. उत्तर गोलार्धात वसंतऋतूचे स्वागत करण्याची वेळ आली आहे. वेळ आली आहे, पुन्हा तुम्हा सर्वांशी संपर्क साधण्याची—तुम्हा सर्व सह-सिद्धयोगीजनांशी व नवीन साधकांशी संपर्क साधण्याची ज्यांना जाणून घेण्यास मी अतिशय उत्सुक आहे.

माझ्या मागच्या पत्रामध्ये, मी काही प्रश्न लिहिले होते. आपण वर्ष २०२५साठीच्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाचे आणि ‘समयाच्या समक्ष’च्या अंतर्गत असलेल्या त्यांच्या शिकवणींचे अध्ययन करत असताना त्या प्रश्नांवर चिंतनमनन करू शकतो. उदाहरणार्थ, समय म्हणजे खरोखरच स्वतंत्रपणे अस्तित्वात असणारी गोष्ट आहे का, त्याचे मोजमाप करता येणे खरोखर शक्य आहे का? की मग तो केवळ एक कथा आहे जी आपण स्वतःला सांगत राहतो, आणि समय तर तसाच असतो जसा तो सदासर्वदा होता—अनंत आणि काही अंशी, अज्ञेय? समयाचे स्वतःचे एक व्यक्तिमत्व, स्वतःचे एक वैशिष्ट्य असू शकते का? किंवा मग, असे आहे का, की एखाद्या विशिष्ट कालावधीमध्ये आपण जे गुण पाहतो व अनुभवतो ते म्हणजे फक्त एक आरसा आहेत, जो आपले स्वतःचे सतत बदलत असणारे अनुभव प्रतिबिंबित करतो? समय बदलतो का, की *आपण* बदलतो? याचे वर्णन करणे खरोखर इतके महत्त्वाचे आहे का?

तुम्ही जर अशा एखाद्या ठिकाणी राहत असाल जिथे ऋतुपरिवर्तन अत्यंत सुस्पष्ट असते—जसे की उत्तर-पूर्व अमेरिकेमध्ये जिथे श्री मुक्तानंद आश्रम स्थित आहे—तर या प्रश्नाचे उत्तर की समय वास्तवात बदलतो का, तो कसा बदलतो हे निश्चितच या गोष्टीवर निर्भर आहे की, तुम्ही तुमच्या आजूबाजूला काय पाहत आहात. प्रत्येक ऋतू इतर ऋतूंपेक्षा लक्षणीयरीत्या भिन्न असतो; जेव्हा एक ऋतुकाल संपून दुसरा ऋतुकाल सुरू होतो, तेव्हा ते निःसंशयपणे समय व्यतीत झाला असल्याचे द्योतक असते. तरीदेखील या गतिशीलतेची एक पद्धत आहे, त्याचे आपले एक स्वरूप आहे. ऋतूंचे चक्र फिरतच राहते. जी गोष्ट आरंभी जिवंत आणि चैतन्यशील होती ती विश्राम पावते; सुरुवातीला

जे सुप्त होते, ते पुन्हा बहरून येते. तर मग, समय एक रेषा आहे का, की तो एक गोलाकार आहे? की मग, त्याचा एखादा पूर्णतः निराळाच आकार आहे?

मार्चचा महिना वसंतकालीन विषुव म्हणजे रात्र व दिवस समान असण्याचा काळ आहे, आणि वसंत ऋतू आपल्यासमवेत घेऊन येतो नवजीवनाच्या पहिल्यावहिल्या सांकेतिक खुणा. नवनवीन कोवळे कोंब जमिनीतून बाहेर डोकावू लागतात. हवेत उष्णता जाणवू लागते, तिच्यात असे काहीतरी असते की, जे *अवर्णनीय* असते—ती अवर्णनीय गोष्ट कदाचित ही आहे की, दिवस जसजसे मोठे होत जातात, तसतसे त्यांमध्ये अधिकाधिक प्रकाशाचे आश्वासन निहित असते; वातावरणात अशी एक अव्यक्त स्फूर्ती असते जी कोणत्याही नवीन आरंभासमवेत जाणवते. त्यामुळे यात काही आश्चर्य नाही की, वसंतकाळाच्या दरम्यान विश्वभरात कित्येक सण साजरे केले जातात. उदाहरणार्थ, भारतात लोक होळी आणि गुढीपाडव्याचा सण साजरा करतात, जे यावर्षी मार्च महिन्यात आहेत.

आपण आत्ता ज्या समयात जीवन जगत आहोत, त्याकडे पाहता मला वसंत ऋतू आणि त्याच्याशी निगडीत असलेले संकेतार्थ यांवर विचार करणे उपयुक्त वाटते, इतकेच नव्हे तर प्रेरणादायीदेखील वाटते. जगामध्ये जे काही घडते आहे, ते पाहून अनेक लोकांना भीती वाटत असेल की, आपण कोठे जात आहोत; अचानक आपली स्थिरता गमावण्याची जाणीव होते आहे. आत्ता जे आहे त्याचे दुःख आणि आपल्याला जे हवे आहे त्याविषयीची अदम्य इच्छा यांच्यादरम्यान प्रत्येक दिवशी आपले लक्ष, आपल्या भावना डळमळीत होऊ शकतात. जर आपण आपले मत मांडू शकलो की, एखादी गोष्ट *याच पद्धतीने* व्हायला हवी, तर आपल्या या दृढ मतामुळेदेखील आपल्या भावना विचलित होऊ शकतात. भयभीत होऊन माघार घेण्याच्या आपल्या प्रबळ इच्छेसमान कदाचित एकच गोष्ट असू शकते आणि ती आहे, आपल्या अंतरीची ही प्रबळ प्रेरणा की, आपण वास्तविक आणि अर्थपूर्ण बदल घडवून आणावेत. असे वाटते की, अशांतता पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे, आपल्या अंतरी आणि आपल्या चहूकडेदेखील. परंतु मग, हेच तर जीवनाचे खरे स्वरूप नाही का? ती गोष्ट जी आधी आपल्याला असे वाटत असे की, आपल्याला समजली आहे, परंतु आता तिच्याविषयीच आपल्या मनात संदेह निर्माण होत आहेत आणि त्याबरोबरच ती गोष्ट जी आपल्याला अजिबात माहीत नव्हती, या सर्वांविषयी उत्तर मिळवण्यासाठी संघर्ष करणे हा एक विचारशील मनुष्य असण्याचाच तर भाग आहे.

तरीदेखील, ही गोष्ट मला दिलासा देते की, लोकांमध्ये खुशी निर्माण करण्याची, आनंद शोधण्याची व तो वृद्धिंगत करण्याची कदाचित अमर्याद क्षमता आहे. इतिहास या गोष्टीचा साक्षी आहे की, मानवाला अगणित समस्यांच्या काळातून जावे लागले आहे. आणि तरीदेखील, त्याने आनंद साजरा करण्याचे *कोणते ना कोणते* कारण, *कोणता ना कोणता* प्रसंग नेहमी शोधलाच आहे. मानवाला

भलेही ज्या कोणत्या समस्यांचा सामना करावा लागला असेल, त्याने आपुलकीने इतरांसोबत बसून, एकमेकांबरोबर आपले अन्न वाटून जेवण केले आहे, आत्मीयतेच्या भावनेने एकमेकांना किस्से ऐकवले आहेत, गायन-वादनाचा आनंद घेतला आहे, हातात हात घालून नृत्य केले आहे. त्याने प्रेम केले आहे; विवाह केला आहे. आणि दरवर्षी वसंतऋतूचे आगमन झाल्यावर, मानवाने निसर्गाच्या सौंदर्याची आणि त्याच्या उदारतेची प्रशंसा केली आहे. मानवाने जीवनाच्या औदार्याचे स्मरण करण्याची निवड केली आहे.

आशेचा, लवचिकतेचा हा भाव एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत तरंगित होऊन पसरू शकतो—तरंगांप्रमाणे पसरणारा हाच भाव श्रीगुरुमाईंच्या 'समयाच्या समक्ष' या शिकवणींचा आधार आहे. तुमच्यापैकी अनेकांच्या हे लक्षात आलेच आहे. जसे की तुमच्यापैकी एका व्यक्तीने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर लिहून पाठवले आहे :

> समयाच्या विषयावर अध्ययन आणि अभ्यास यांचा जो प्रसाद श्रीगुरुमाई आपल्याला प्रदान करत आहेत, तो अनेकानेक कारणांमुळे अतिशय उत्साहवर्धक आहे. आता, दररोज सकाळी जाग येताच माझ्या अंतरी गहन उत्सुकतेने हा प्रश्न उद्‌भवतो, "ओह! आज समय काय असेल बरे!"

होय; समय *काय* आहे? समय *काय* असेल? असा विचार करणे की, समय एक कोरी पाटी आहे ज्यावर काहीही लिहिले जाऊ शकते, अशी कच्ची ओली माती आहे जिला कोणताही आकार दिला जाऊ शकतो; अशी खात्री बाळगणे की, प्रत्येक दिवस नवीन असू शकतो, हा विचार आपल्याला स्फूर्तीने व्यापून टाकतो. समयाप्रति आपला दृष्टिकोण कसा असावा, आपण कशा प्रकारे वेळेचा उपयोग करावा, याविषयी निदान *आपण* तरी दररोज नवीन होऊच शकतो, ही आशा आपल्याला स्फूर्तीने व्यापून टाकते. वसंत ऋतूच्या समयी, इथे, श्री मुक्तानंद आश्रमामध्ये सर्वप्रथम दिसणाऱ्या रोपट्यांपैकी एक असते, स्नोड्रॉपचे रोपटे. याची फुले शुभ्रवर्णी व साधीशी असतात, ज्यांच्या छोट्याछोट्या पाकळ्या जमिनीपासून काही इंचावरच उमलतात, परंतु त्याची सहनशीलता, त्याची मजबुती विलक्षण असते. बहुधा असे घडते की, जेव्हा हे रोप उगवते, त्या समयी जमिनीवर अजूनही बर्फाची चादर पसरलेली असते; वस्तुतः स्नोड्रॉपच्या फुलांमध्ये तापमानानुसार उमलण्याची व मिटण्याची क्षमता असते—हवामान जेव्हा अतिशय थंड असते, तेव्हा त्यांच्या पाकळ्या सुरक्षेसाठी आपोआप मिटतात आणि वातावरण जेव्हा परत उष्ण होते, तेव्हा ही फुले पुन्हा उमलतात. अशा प्रकारे, ही सानुली फुले स्वतःच्याच पद्धतीने आपल्याला काही शिकवत आहेत—की कशा प्रकारे आपण आव्हानांवर विजय मिळवावा, जे काही घडले आहे त्या परिस्थितीत राहत असतानादेखील कसे निर्भय राहावे, आपण कशा प्रकारे या दृढ समजूतीसह जीवन जगावे की, अशी कोणतीही

परिस्थिती नसते की, जी बदलत नाही. आपल्यासाठी आणखी अधिक आंतरिक बळ नेहमीच उपस्थित असते, ते आपल्यासाठी सदैव सुलभ असते.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.